# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ 829 /२०२४ दि. ३०.०८.२०२४

## निविदा सूचना

प्रति,

........................................

........................................

.....................................

विषय :- सन २०२४-२५ करिता मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व मळणीचे कामे कंत्राटी पद्धतीने कम्बाईन हार्वेस्टर ने करण्याकरिता प्रती हेक्टर दर कळविणे बाबत......

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील खरीप व रब्बी हंगाम सन २०२४-२५ मधील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व मळणी चे कामे कंत्राटी पद्धतीने कम्बाईन हार्वेस्टरने करण्याकरिता इच्छुक कंत्राट दाराकडून प्रति हेक्टर दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदेचे स्वरूप/निविदा मसुदा सोबत जोडण्यात आलेला आहे.

अटी व शर्ती

१. निविदा/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी. तसेच लिफाफ्यावर "पिकांची कापणी व मळणीकरिता कम्बाईन हार्वेस्टर चे दर " असे नमूद करावे.
३. निविदा/कोटेशन मध्ये कंत्राटदाराचे संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबर ई. स्पष्टपणे नमूद करावे.
४. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.
५. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांची कापणी व मळणीचे कामे करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या सर्व यंत्र सामग्री सुव्यवस्थित असणे आवश्यक आहे तसेच त्यावर असणारे चालक सुद्धा परवानाधारक असणे आवश्यक आहे.
६. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांची कापणी व मळणीचे कामे कम्बाईन हार्वेस्टरने करिता असतांना मशीन बिघडल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम कापणी व मळणीचे कामे कम्बाईन हार्वेस्टरने करीत असतांना कोणताही मजूर, इंधन व आवश्यक साहित्य या कार्यालातर्फे पुरविण्यात येणार नाही.

८. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांची कापणी व मळणीचे कामे कम्बाईन हार्वेस्टरने करीत असतांना दुर्घटना/अपघात किंवा जीवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटधारकाची राहील.

९. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांची कापणी व मळणीचे कामे करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटधारका कडून वसूल करण्यात येईल.

१०.विभागांचे प्रक्षेत्रावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

११.विभागावर देण्यात आलेले पिकांची कापणी व मळणीचे कामे पूर्ण करण्यात यावे, क्रामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१२.विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राट धारकांना बंधनकारक राहील.

१३.वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. १०.०९.२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

# निविदा मसुदा

प्रति,

.......................................

.......................................

....................................

विषय :- मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व मळणी चे कामे कंत्राटी पद्धतीने कम्बाईन हार्वेस्टरने करण्याकरिता प्रती हेक्टर दर कळविणे बाबत......

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्रावर खरीप व रब्बी हंगाम सन २०२४-२५ मधील विविध पिकांची कापणी व मळणी चे कामे कंत्राट पद्धतीने कम्बाईन हार्वेस्टरने करण्याकरिता मला सर्व अटी व शर्ती मान्य असून प्रती हेक्टर दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पिकाचे नाव | कम्बाईन हार्वेस्टर ने कापणी व मळणी करणे दर रु. प्रती हेक्टर |
|---|---|---|
| १. | सोयाबीन | |
| २. | तूर | |
| ३. | उडीद | |
| ४. | करडी | |
| ५. | हरभरा | |
| ६. | गहू | |
| ७. | मोहरी | |

**क्लास (Class) कंपनीच्या कम्बाईन हार्वेस्टरला प्राधान्य देण्यात येईल.**

ठिकाण:

दिनांक:

स्वाक्षरी

नाव, मो.नं. व संपूर्ण पत्ता